ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# भारताचे परराष्ट्र धोरण निर्धारक, समस्या आणि आव्हाने

**प्रा. डॉ. सुशांत चिमणकर**
*पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग*
*डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू.एस कला,*
*वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नागपूर*

***सारांश***
*आधुनिक राज्य–राष्ट्र संकल्पनेची पाळेमुळे वेगाने रूजून विविध राष्ट्रांदरम्यान परस्पर संबंधात वृद्धी होण्यातून सुनिश्चित परराष्ट्र धोरण आखण्याची गरज सर्व राष्ट्रांच्या सरकारांना जाणवू लागली. पाश्चिमात्य देशांच्या वसाहतवादाचा निर्णायक शेवट होऊन अनेक नव्या राष्ट्रांचा उदय झाल्यांनतर आंतरराष्ट्रीय संबंधामधील गुंतागुंत अधिकच वाढायला लागली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेने विविध राष्ट्रांना आपआपली भूमिका मांडण्याचे व्यासपीठ उपलब्ध होऊन राष्ट्र–राष्ट्रांमधील संवादात वाढ झाली. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये आणि राष्ट्रा–राष्ट्रांतील संवादात सुसूत्रता आणण्यासाठी प्रत्येक देशाला साचेबद्ध परराष्ट्र धोरणाची आवश्यकता जास्त तीव्रतेने जाणवायला लागली. बहुतांश राष्ट्रांनी एकलकोंडापणा न स्वीकारता जास्तीत जास्त राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करण्याचे धोरण स्वीकारले. ज्या राष्ट्रांनी काही काळाकरिता काही राष्ट्रांशी जाणीवपूर्वक संबंध प्रस्थापित करण्याचे टाळले त्या मागे सुद्धा एक विशिष्ट प्रकारचे परराष्ट्र धोरणच आहे. त्याचप्रमाणे, सुनिश्चित उद्दिष्टांचे परराष्ट्र धोरण न आखणे हेच एक प्रकारचे धोरण आहे. विशिष्ट परराष्ट्र धोरण नसणाऱ्या राष्ट्राची तुलना मैदानात उतरलेल्या पण विरोधकांवर गोल डागण्याची कोणतीच योजना नसलेल्या फुटबॉल चमूशी करता येईल. जागतिक पटलावर अस्तित्वात असणाऱ्या एखाद्या राष्ट्राच्या सरकारातील व्यक्ती परराष्ट्र धोरणाशिवाय राज्यकारभार चालवित असतील तर शक्तिशाली व योजनाबद्धरित्या कार्य करणाऱ्या इतर राष्ट्रांद्वारे त्या राष्ट्राचे शोषण होण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. परराष्ट्र धोरण अस्तित्वात नसल्यास राष्ट्राच्या परराष्ट्र विभागास द्वी–पक्षीय संबंध प्रस्थापित करण्याबाबत, देशाच्या संरक्षण खात्यास संरक्षण सिद्धतेबाबत योग्य मार्गदर्शक तत्त्वे मिळणार नाही. कारण परराष्ट्र धोरणाच्या अभावी मित्र देश, मदतीस तत्पर देश, शत्रू देश, तथस्थ देश याप्रमाणे विविध राष्ट्रांची विभागणी करता येणार नाही. अर्थ मंत्रालय आणि वाणिज्य मंत्रालयास देशाचा आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविण्यासाठी कसलेही मार्गदर्शन मिळणार नाही. एकंदरीत, राष्ट्र–राज्ये जागतिक पटलावर अस्तित्वात असतील तोपर्यंत प्रत्येक राष्ट्राला परराष्ट्र धोरणाची आवश्यकता असेल.*

**शब्दकुंजी :**
*परराष्ट्र धोरण, शीतयुद्ध, अलिप्तावाद, राजनय, युपीए सरकार.*

**प्रस्तावना :**

शीत युद्धोत्तर परिस्थितीने भारतीय परराष्ट्र धोरणा समोर बरीच नवीन आव्हाने उभी केली आहे. या नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी भारत इतर सर्व जबाबदार देशांचे सहकार्य मिळवत आहे. तथापी भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या सहकार्याची चौकट शीतयुद्धोत्तर काळातसुद्धा कमी अधिक प्रमाणात तीच आहे. भारत हा अलिप्तता धोरणाला बांधील राहतो कारण त्याचे मुलभूत ध्येय हे देशाचे स्वातंर्त्य आणि सार्वभौमत्व अबाधीत राखणे आणि लष्करी आघाडीच्या बाबतीत जागतिक राजकारणाला अटकाव करणे हे राहिलेले आहे. जागतिक राजकारणातील वर्चस्व आणि इतर देशांविरुद्ध लष्करी आघाडी उभारणे याला विरोध करण्याचे भारताचे मुलभूत धोरण बदललेले नाही आणि अलिप्तावाद हा असून सुद्धा त्याच्या परराष्ट्रधोरणासाठी अर्थपूर्ण आहे. अणुसंपन्न देश बीग 5 यांचे अण्वस्त्र निःशस्त्रीकरण्यासाठी वेळेत व परिणामकारकरित्या करण्यातील अपयशाने भारताला त्याच्या दीर्घकालीन सुरक्षा आव्हानांना सामोरे ठेवून अणूकार्यक्रम विकसीत करण्याची निवड करण्यास बाध्य केले. तथापी भारत हा अण्वस्त्र संपन्न देश म्हणून जबाबदार भूमिका निभावतो कारण त्याने सर्वसमावेशक आणि जागतिक निःश्त्रीकरण उपायांसाठीच्या मागणीसह प्रथम वापर न करण्याचे धोरण जाहीर केले आहे. भारत अणूदुर्घटना टाळण्यासाठी पाकिस्तान आणि चीनसह अणूकार्यक्रम विषयक विश्वास, सबलीकरण उपाय सुचवितो आणि या देशांना विधायक चर्चेत गुंतवितो. भारताने शीतयुद्धोत्तर काळात त्याच्या परराष्ट्र धोरणाला समतोल करण्यासाठी युनायटेड स्टेट्स, युरोपियन संघ आणि इस्त्राईलकडे मैत्रीचा हात पुढे केला. आणि त्याला देशी आर्थिक धोरणाशी सुसंवादी बनवले. बलाढय सोव्हिएत युनिअनच्या अस्तंगत होण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी त्याने दक्षिणपूर्व आशियाई, आफ्रिकी तसेच लॅंटीन अमेरिकन देशांपर्यंत पोहचण्याच्या प्रयत्नांना गती दिली आहे. एक ध्रुवीय जगाच्या अस्तित्वाला भारताचा विरोध राहिलेला आहे आणि बहुध्रुवीय जगाच्या उदयासाठी भारताने रशिया, ब्राझील, चीन आणि दक्षिण आफ्रिकेसोबत हात मिळवणी केली. नवीन काळात ब्रिक्स आणि जी–२० ही भारतीय परराष्ट्र धोरणाची महत्वाची साधने बनलेली आहेत. असे असले तरी भारताने नॅंम आणि संयुक्त राष्ट्रांचे काळाच्या कसोटीस उतरलेले व्यासपीठ त्यागलेले नाही. भारत संयुक्त राष्ट्र व आय–एस.एफ जागतिक बॅंक रचनेत सुधारणा सुचवितो जेणेकरून ते अधिक लोकशाही आजच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचे प्रतिबिंब दर्शवेल. भारत सर्व देशांसोबत दहशतवाद आणि

जागतिक तापमानवाढीच्या नवीन आव्हानांना तोंड देण्यासाठी सहकार्य मिळवितो. म्हणून या मुद्यावरील सर्व आंतरराष्ट्रीय चर्चामध्ये मनापासून सहभागी होतो. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे त्याचे व सार्वभौमत्व अबाधीत ठेवणे, सर्व देशांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे आणि मागील 75 वर्षात राहिलेली शांततामय आंतरराष्ट्रीय सुव्यवस्था वाढविणे.

## परराष्ट्र धोरणाचे निर्धारण

परराष्ट्र धोरणाचे निर्धारण ही तशी गुंतागुंतीची प्रक्रिया असते. देशाचे परराष्ट्र धोरण ठरविण्याचा किंवा परराष्ट्र धोरणाविषयक महत्वाचे निर्णय घेण्याचा अधिकार त्या देशाच्या सरकारला प्राप्त झालेला असतो. प्रत्येक देशाचे सरकार देशांतर्गत तसेच बाह्य परिस्थितीशी संबंधित असलेल्या विविध घटकांची योग्य दखल घेऊन आपल्या परराष्ट्र धोरणाची आखणी करीत असतेय म्हणजे म्हणजे परराष्ट्र धोरणाविषयक निर्णय घेणे हे अधिकारावर असलेल्या सरकारचे काम असते. प्रत्येक देशाच्या शासनसंस्थेतील प्रमुख घटक त्यासंबंधीची आपली जबाबदारी उचलत असतात. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ हे शासन संस्थेचे तीन प्रमुख घटक होत. यापैकी न्याय मंडळ या घटकाचा किंवा संस्थेचा देशाच्या परराष्ट्र धोरणाच्या निधार्णाशी फारसा संबंध येत नाही. परंतु कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ या दोन संस्था मात्र परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात महत्वाची भूमिका बजावत असतात. याखेरीज नोकरशाही या आणखी एका घटकाची भूमिकाही तितकीच महत्वपूर्ण असते.[१]

आपल्या परराष्ट्र धोरणात जे नवीन विभाग करण्यात आले आहेत, त्यात प्रामुख्याने भारतात येणारी परकीय मदत आणि भारत अन्य देशांना करत असलेली मदत या दृष्टीने काही विभागांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त भारताची 'ट्रेड अंड इकोनॉमिक डिप्लोमसी' म्हणजे व्यापार आणि आर्थिक राजनय' यांना गृहित धरून काही विभाग करण्यात आले आहेत. तसेच 'सागरमाला', 'बिमस्टेक', अक्त ईस्ट', या माध्यमातून देशाची सामरिक गरज, आर्थिक गरज भागविण्याचा प्रयत्न भारत करत आहे. या प्रकल्पांना पूर्ण रूप देण्यासाठी राजनयाची शक्ती वापरली जावी, यासाठीही काही विशिष्ट विभाग तयार केले आहेत. त्यांचे वेगवेगळे संचालक, तसेच वरिष्ठ राजदूत यांना दैनदिन परराष्ट्र धोरणामधून अलिप्त ठेवण्यात आले आहे. त्यांनी फक्त मोठया प्रकल्पासाठी त्यांची उर्जा खर्च करणे अपेक्षित आहे. थोडक्यात, परराष्ट्र धोरणा आणि सामरिक मुद्दे यांच्यामध्ये पहिल्यांदाच विभागणी करण्यात आली आहे. परराष्ट्र धोरणाविषयी मुद्दे हाताळणारी नोकरशाही वेगळी असून, ज्या सामरिक प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी विशेष ज्ञान लागणार आहे, ते स्वतंत्र करण्यात आले आहेत.

## नेहरूचे परराष्ट्र धोरण

स्वतंत्र भारताच्या परराष्ट्रविषयक धोरणाचा पाया पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी रचला. नेहरूंनी समाजवादी अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून देशाला दिशा देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. पहिल्या पंधरा वर्षांत भारताने पूर्व व पश्चिमेकडील दोन्ही सत्तांशी सलोख्याचे संबंध राखले. दोघांकडून आर्थिक सहाय्यही मिळविले. पं. नेहरूंनी तब्बल १६ वर्षे परराष्ट्र मंत्रालय सांभाळले. याच काळात त्यांनी ४० देशांमध्ये दूतावास स्थापन करून, भारताची जागतिक राजकारणातील प्रतिमा निर्माण केली. आंतरराष्ट्रीय राजकारणात नेहरू, इजिप्तचे अध्यक्ष नासेर आणि युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो या त्रिमूर्तीने 'अलिप्त राष्ट्र' संघटनेची मुहूर्तमेढ रोवली. तो काळ देश नेहरूंच्या अलिप्ततावादी कल्पनांनी भारलेला होता. भारताच्या परदेशविषयक धोरणाला नेहरूंच्या कट्टर विचारधारेची धार होती. सुरुवातीला भारताची आर्थिक प्रगती संथ गतीने होऊ लागली. उलट चीन आणि जपानसारखी राष्ट्रे प्रगतीशील मार्गाने वाटचाल करीत होती. जागतिक व्यासपीठावर भारत जरी अलिप्ततावादाचा पुरस्कार करीत होता, तरी राजकीय आघाडीवर सोव्हियत रशियाशी अधिक जवळीक दिसत होती. नेहरूच्या काळात भारताकडे तिसऱ्या जगाचे नेताराष्ट्र म्हणून बघितले जायचे.[२]

सन 1977 ते 1980 या काळात काँग्रेस व्यतिरिक्त इतर पक्षांच्या आघाडीने दिल्लीवर राज्य केले. हा एक अपवाद वगळला, तर या सर्व धोरणावर भारतातील जुन्या व मोठ्या पक्षाचे वर्चस्व असल्याचे आढळते. नेहरूंनंतर हा पक्ष इंदिरा गांधी आणि नंतर राजीव गांधी यांच्या प्रभावाखाली आला. सहाजिकच भारताच्या परराष्ट्र धोरणावर नेहरू–गांधी घराण्याचाच प्रभाव राहिला आहे. नेहरूंनी एक बळकट आणि उच्चतम अर्थव्यवस्था देशाच्या हाती देण्याचा प्रयत्न केला. इंदिरा गांधींनी त्या अर्थव्यवस्थेला लोकप्रियतेची जोड दिली.

## इंदिरा गांधीचे परराष्ट्र धोरण

सन 1971 च्या निवडणुकीत इंदिरा गांधींना जनतेने जो भरघोस पाठिंबा दिलाय त्यामुळे सर्व सत्ता गांधी यांच्या हाती एकवटली. 1971 मध्ये बांगलादेश स्वतंत्र करण्यासाठी भारताने जी तडफ दाखविलीय त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील दबदबाही वाढला. या कारवाईमुळे भारताचे सोव्हियत रशियाशी असलेले संबंध अधिक दृढ झाले. साहजिकच या युद्धावेळी व नंतरही अमेरिकेचा कल पाकिस्तानकडे राहिला. भारताची रशियाशी जवळीक वाढल्याने, साहजिकच अमेरिकाही अधिकाधिक पाकिस्तान धार्जिणी झाली. 1974 मधील पहिल्या अणुचाचणीनंतर अमेरिकेने भारतावर काही बाबतींत बहिष्कार टाकला. या दोन्ही घटनांमुळे भारताचे अमेरिकेशी शत्रुत्व वाढत चालले आहे, असा समज दृढ होत गेला. या काळात अमेरिकी अध्यक्ष निक्सन यांची इंदिरा गांधींवर नाराजी होती. विशेषतः सत्तरच्या दशकाच्या अखेरीस, भारत अलिप्ततावादापासून दूर सरकला आणि वसाहतवादी पश्चिमी राष्ट्रांपेक्षा साम्यवादी रशिया आपल्याला जवळचा वाटू लागला. नवी दिल्ली येथे अलिप्तावादी राष्ट्रांच्या सातव्या शिखर शिखर परिषदेच्या अध्यक्ष म्हणून इंदिरा गांधी यांची निवड केली होती.[३] 1980 मध्ये पुन्हा सत्ता मिळाल्यानंतर

इंदिरा गांधी आणि त्यांच्या पश्चात राजीव गांधींनी विचारपूर्वक अमेरिका आणि पश्चिमी जगाशी असलेल्या संबंधांची नव्याने बांधणी करण्याचा प्रयत्न केलाय त्याचबरोबर चीन व पाकिस्तान यांच्याशी असलेले संबंधही सामान्य स्तरावर आणण्याचा प्रयत्न केला. याचवेळी देशांतर्गत राजकीय पातळीवर असंख्य आव्हानांना तोंड देण्याचा प्रसंग आला. पंजाब, जम्मू–काश्मीर आणि वायव्य सीमा येथे अशांतता वाढत चालली होती. आखाती देशांमध्येही अनेक प्रकारे अशांतता होती. अरब– इस्राईल संघर्ष पेटलेला होता आणि दुसरीकडे इराण–इराक युद्ध अनेक वर्षे चाललेय त्यामुळे तेलाचे भाव वाढतच गेले. 1990च्या दशकात डिजिटल युग अवतरले. भारताची अर्थव्यवस्था जसजशी विकसित होऊ लागली, तसा परराष्ट्र धोरणामध्ये बदल होऊ लागला. अलिप्ततावादी धोरण बाजूला ठेवले गेले.

पी. व्ही. नरसिंह राव यांच्या काळात परराष्ट्र धोरण नव्याने आखण्यात आले. भारताचा अणू विषयक कार्यक्रम बाजूला ठेवण्यासाठी अमेरिकेकडून सतत दबाव येत होता. त्याला राव यांनी जुमानले नाही.[४] 1996 ते 1998 या काळात पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांनी शेजारी राष्ट्रांशीय विशेषतः पाकिस्तानशी सलोखा राखण्यावर भर दिला. नंतरचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि डॉ. मनमोहनसिंग यांनी याच धोरणाचा पाठपुरावा केला. 'सार्क' देशांकडे भारताने अधिक लक्ष दिले आणि दक्षिण आशियाई राष्ट्रांशी आर्थिक व सुरक्षा संबंध मजबूत केले[५]

## अटलबिहारी वाजपेयीचे परराष्ट्र धोरण

सन 1998 मध्ये अटल बिहारी वाजपेयी यांनी पाच अणुचाचण्या घेतल्या आणि भारत एक आण्विक सत्ता असल्याचे जाहीर केले. यामुळे तत्कालीन अमेरिकी अध्यक्ष बिल क्लिंटन यांची नाराजी ओढावून घेतलीचय शिवाय निर्बंधदेखील. तरीही वाजपेयी यांनी भारत व अमेरिका संबंधात विशेष प्रगती केली आणि हे दोन देश नैसर्गिक मित्र असल्याचे संबोधले. त्यांच्या काळात अमेरिकेशी आण्विक करार करण्याबाबत धोरण आखले जात होते. 1999 च्या कारगिल युद्धानंतर, पाकिस्तानशी संबंध अधिकच चिघळत गेले. मे 1998 मध्ये पोखरणच्या वाळवंटात अण्वस्त्रचाचण्या घेतल्या होत्या. त्यावेळी याचा रोख पाकीस्थान विरुद्ध नव्हे तर चीनविरुद्ध आहे, चीन हा भारताचा पहिल्या क्रमांकाचा शत्रू आहे असे मत तत्कालीन संरक्षण मंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी व्यक्त केले. त्यामुळे चीन आणि भारताच्या संबंधात कटुता निर्माण झाली.[६]

## डॉ. मनमोहनसिंग यांचे परराष्ट्र धोरण

डॉ.सिंग २००४ मध्ये सत्तेत आले. यांनी चीन, पाकिस्तान व बांगलादेश या देशांसाठी धोरण जाहीर केले होतेय परंतु त्याची फलनिष्पत्ती झाली नाही. 'यूपीए' सरकारच्या काळात आर्थिक विकासाची गती थोडी मंदावली. अंतर्गत सुधारणेसाठी अनेक पर्याय उपलब्ध होते. 2005 ते 2007 या काळात पाकिस्तानचे प्रमुख परवेज मुशर्रफ यांच्याशी संवाद साधताना, डॉ. सिंग काश्मीरप्रश्नी निर्णायक स्वरूपात आले होते. याच काळात चीनविषयीचे धोरणही काही प्रमाणात सुधारत होते. 2009 मध्ये पुन्हा सत्ता प्राप्त केल्यानंतर, अमेरिकेशी असलेले संबंध दृढ करण्याचा प्रयत्न काँग्रेस सरकारकडून झाला नाही. अमेरिकेशी भागीदारी करण्याचे त्यांचे विचार सीमित राहिले. या काळात परराष्ट्र नीतीवर फार प्रभाव पाडता आला नाही, हे वास्तव आहे. परंतु दोन दशकांमध्ये ज्या प्रमाणे भारतातील परकीय भांडवली गुंतवणूक वाढली त्याचप्रमाणे भारतीयांची परराष्ट्र गुंतवणूकही मोठया प्रमाणात वाढली.[७] पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद ही नव्वदच्या दशकात मोठी समस्या बनली होती. आपले सरकार आणि राजनैतिक अधिकारी नेहमीच अमेरिकेच्या दबावाखाली राहताना दिसतात. काश्मीरमध्ये आजपर्यंत झालेल्या विविध दहशतवादी हल्ल्यांत हजारो लोक ठार झाले. याबाबतीत कठोर मुकाबला करण्याऐवजी धरसोडीचे धोरण अवलंबलेले दिसते. एकंदरीत, भारत–पाकिस्तान संबंध सुधारणे हे मोठे आव्हान होते.

## मोदीच परराष्ट्र धोरण

भारतीय जनता पक्ष २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर, अल्पावधीतच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जागतिक नेत्यांशी उत्तम संबंध प्रस्थापित केले. पहिल्या दहा महिन्यांतच भारताच्या राजनैतिक संबंधांना अतिशय वेग आला. मोदींनी सुमारे ६२ देशांचा दौरा केला आणि अनेक राष्ट्रप्रमुख, नेते, उद्योगपतींच्या भेटी घेतल्या. विविध राष्ट्रांचा दौरा करताना, मोदी तेथील उद्योजक व मूळ भारतीय वर्गाशी आवर्जून संवाद साधताना दिसले. या संवादात ते वेळोवेळी 'मेक इन इंडिया'चा आवर्जून उल्लेख करतय जेणेकरून भारतात गुंतवणूक वाढेल आणि अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. इस्राईलला भेट देणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान ठरले.

केंद्रात २०१४ साली नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार अस्तित्वात आल्यानंतर परराष्ट्र व्यवहारांत थोडे नवचैतन्य आल्याचे दिसले खरे, मात्र लवकरच या बाबतीत भ्रमनिरास झालेला जाणवले. मोदी यांनी त्यांच्या शपथविधीसाठी शेजारी देशांच्या नेत्यांना आमंत्रित केले होते. पण त्यातील सकारात्मकता पाकिस्तानच्या दहशतवादी हल्ल्यांनी नष्ट केली. मोदींनी पंतप्रधान म्हणून पहिला अधिकृत दौरा केला तो नेपाळचा. पण आज तोच नेपाळ चीनच्या कह्यात जाऊन भारतीय भूप्रदेशावर हक्क सांगत आहे.[८]

बांगलादेश, म्यानमार, श्रीलंका, मालदीव या देशांत चीनचा प्रभाव वाढत आहे. नेहरूंच्या काळात परराष्ट्र व्यवहारांत जसा त्यांच्या वैयक्तिक करिष्म्याचा वाटा होता तसाच मोदीही निर्माण करू पाहत आहेत. पण या दोघांनाही त्यात अपयश आल्याचे दिसते. मोदींनी परदेशी नेत्यांच्या भेटीत उठसूट त्यांना मिठ्या मारल्या. याने प्रसारमाध्यमांना खुसखुशीत खाद्य मिळत असले तरी परराष्ट्र धोरणाला काही पोषण मिळत नाही, हे दिसून आले आहे. ट्रम्प यांना मिठ्या मारूनही त्यांनी व्हिसा धोरणात भारताला फटका दिला. अमेरिकेच्या अधिक जवळ जाताना भारताला इराणसारखा मित्र दुखवावा लागत आहे. तेथून होणारा खनिज तेलपुरवठा बंद झाला

आहे आणि तेथील चाबहारसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांचे भवितव्य अनिश्चित झाले आहे.

**भारत सरकारच्या परराष्ट्र धोरणा समोरील आव्हाने–**

**मित्रराष्ट्रांशी तणावाचे संबंध**

बांगलादेश, चीन, नेपाळ, श्रीलंका या शेजारील देशांशी कधीकाळी भारताचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. परंतु परिस्थितीनिरूप हे संबंध टोकाला गेले आहे. बांगलादेश स्वतंत्र होण्यासाठी भारताने जीवाचे रान केले. परंतु भारता समोर त्या देशाने अनेक प्रश्न निर्माण केले, अवैध मार्गाने व्यापाराल उत्तेजन देणे, शस्त्रास्त्रे, मादक द्रव्ये इत्यादींचा छुपा व्यापार करणाऱ्यास उत्तेजन व संरक्षण देणे यासारख्या बऱ्याच उपद्रवी कारवायामुळे भारतात अशांतता निर्माण झाली. त्याचा विपरीत परिणाम भारताच्या परराष्ट्र धोरणावर झाला. चीन ने बांडुंग परिषदेत भारतासोबत पंचशील करार केला परंतु त्या करारातील तत्त्वे चीनने कधीच अमंलात आणले नाही.[९] त्याउलट भारताच्या विरोधात छुप्या मार्गाने कारवाया चालूच ठेवल्या. म्हणूनच दोन्ही राष्ट्रात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याचा परिणाम परराष्ट्र धोरणावर होताना दिसतो. त्याच प्रमाणे नेपाळ या शेजारी राष्ट्राला भारताने नेहमीच मदतीचा हात दिला आहे. नेपाळवर जेव्हा जेव्हा संकटे आलीत तेव्हा तेव्हा भारत धावून गेला आहे, परंतु आज नेपाळ हा चीन सोबत छुप्या पद्धतीने हातमिळवणी करतो आहे. याचा विपरीत परिणाम भारतच्या परराष्ट्र धोरणावर झाला आहे.

चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनाही मोदींनी झोपाळ्यावर बसवून अलिंगन दिले. पण त्याच वेळी चीन लडाखमध्ये घुसखोरी करत होता. त्यामुळे चीनबाबत नेहरूंप्रमाणेच मोदींनीही हात पोळून घेतले आहेत. लडाखमध्ये झालेली चूक निस्तरण्यासाठी आता कितीही प्रयत्न केले तरी झालेले नुकसान भरून येत नाही. अमेरिकेच्या अधिक जवळ जाण्याने रशियाही भारतावर नाराज होत आहे. रशियाने आता पाकिस्तानला शस्त्रपुरवठा सुरू केला आहे. तसेच तो चीनच्या अधिक जवळ जात आहे.

आर्थिक हितसंबंध साधण्याचे साधने

गेल्या शतकात राजकीय विचारसरणीच्या दृष्टीने परराष्ट्र धोरण आखले जात होते. तो काळ शीतयुद्धाचा होता. शीतयुद्धोत्तर काळात मात्र प्रत्येक देशासाठी आपले आर्थिक आणि व्यापारी हितसंबंध जोपासणे प्राधान्याचे साधन म्हणून प्रत्येक देश परराष्ट्र धोरणाकडे पाहतो. त्या दृष्टीकोनातून राजनयाकडेही पहिले जात आहे. राजनय आणि परराष्ट्र धोरणाकडे पाहतो. त्या दृष्टीकोनातून राजनयाकडेही पहिले जात आहे. राजनय आणि परराष्ट्र धोरण यांचे प्रमुख उद्धीष्ट्य हे वाटाघाटी करण्याचे आहे, जेणेकरून भारताची व्यापारी, आर्थिक उद्धीष्ट्य साध्य होतील. त्या दृष्टीकोनातून परराष्ट्र धोरणाकडे पाहण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. या बदलांची सुरवात डॉ. मनमोहन सिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या काळापासून दिसू लागली. २०१३ मध्ये भारताचे सर्व राजदूत, परराष्ट्र मंत्रालयातील अधिकारी यांची परिषद डॉ. मनमोहन सिंग यांनी घेतली. त्या वेळी त्यांनी नव्या परराष्ट्र धोरणांचा सैद्धांतिक पाया घातला. या परिषदेदरम्यान 'भविष्यातील भारताचे परराष्ट्र धोरण हे सर्वसामान्य माणसांच्या आकांक्षाचे प्रतिनिधित्व करणारे असेल,' असे ते म्हणाले होते.[१०] आज त्याची प्रचीती येताना दिसते.

एस. जयशंकर यांनी परराष्ट्र मंत्रालयात बदल घडवून आणले ते प्रामुख्याने भारताचा वाढलेला आंतरराष्ट्रीय व्यापार, वाढलेली आयात–निर्यात या पार्श्वभूमीवर आहे. भारतातील परकीय गुंतवणूक कशी वाढवता येईल, 'मेक इन इंडिया', 'क्लिन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' 'डिजिटल इंडिया', यासारख्या महत्वपूर्ण प्रकल्पांसाठी आवश्यक निधी, तंत्रज्ञान हे प्रदेशांकडून कसे मिळविता येईल यासाठी परराष्ट्र धोरण हे के साधन म्हणून वापरले जात आहे. 2014 ते 2019 या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ७० हून अधिक देशांचे दौरे झाले, ते प्रामुख्याने देशाचे आर्थिक हितसंबंध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने म्हणजेच उपरोक्त प्रकल्पांना पूर्णत्व देण्यासाठी करण्यात आले.[११]

**व्यापार आणि आर्थिक राजनय –**

एका बाजूला हे बदल होत असतानाच देशाच्या परराष्ट्र धोरणापुढील आव्हानेही वाढत आहेत. आशियातील चीनचा वाढता आक्रमकतावाद, 'बीआरआय' सारखे प्रकल्प, हिंदी महासागरातील घुसखोरीचे प्रयत्न, शेजारी देशांना कर्जबाजारी करून, तेथे घुसखोरी करून भारताला कोंडीत पकडण्याचे प्रयत्न, पाकिस्तानातील आर्थिक परिक्षेत्र, सामरिक संबंध या सर्वांमुळे भारतापुढे मोठे आव्हान उभे आहे.[१२] अशा आव्हानांना कसे हाताळायचे, त्यांचा सामना कसा करायचा हे पाहणे गरजेचे आहे. त्यामुळे गुंतागुंतीच्या झालेल्या परराष्ट्र धोरणाची हाताळणी कशी करायची हा आज महत्वाचा प्रश्न आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय परराष्ट्र धोरणाचे अधिकाधिक लोकशाहीकरण होणे गरजेचे आहे. तसेच त्यात पारदर्शकता आवश्यक आहे. भारतीय संघराज्य हे सहकार्यात्मक संघराज्य असले, तरी आता ते स्पर्धात्मक संघराज्य बनले आहे. त्याचे प्रतिबिंब परराष्ट्र धोरणात उमटणे गरजेचे आहे. आतापर्यंत परराष्ट्र धोरण हा केंद्राच्या अखत्यारीतील मुद्दा असला, तरीही घटक राज्यांचेही त्यात काही म्हणणे आहे. त्यामुळे राज्यांची मतेही जाणून घेणे आवश्यक आहे. आज अनेक मुख्यमंत्रीही प्रदेशात जाऊन राज्यांसाठी परकीय मदत मिळवताहेत. आज राज्याराज्यात परकीय गुंतवणूक आकर्षित करण्याची स्पर्धा सुरु आहे. त्यामुळे राज्यांचा सहभाग परराष्ट्र धोरणात असलाच पाहिजे. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, परराष्ट्र मंत्रालयात सध्या कर्मचारी वर्ग कमी आहे. अन्य देशांशी वाटाघाटी करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. येत्या काळासाठी हे आव्हान आहे. याखेरीज युरोपीय संसदेत 'सीएए' च्या विरोधात प्रस्ताव मांडला जाणे अशा स्वरुपाची आव्हाने येतात, तेव्हा त्यांचा मुकाबला कसा करायचा याचा साकल्याने विचार करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे देशांतर्गत पातळीवर 'सीएए', 'एनआरसी', आदी मुद्दयांवर

निर्माण झालेल्या अवस्थतेचा परिणाम परकीय गुंतवणुकीवर होणार नाही, भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेवर होणार नाही, याची दक्षता परराष्ट्र मंत्रालयाने घेणे गरजेचे आहे. त्यासाठी येत्या काळात परराष्ट्र मंत्रालयाला जोरदार प्रयत्न करावे लागतील.

**वसाहतवादी धोरण**

गेल्या काही वर्षांत भारताचे परराष्ट्र धोरण काहीसे वास्तववादी होताना दिसते. इतकी वर्षे इस्रायलशी चांगले संबंध असूनही तेलपुरवठादार अरब देशांना नाखुश करावे लागू नये म्हणून भारताने इस्रायलच्या संबंधांना अधिकृत मान्यता दिली नव्हती. ती आता देण्यात आली. हे थोडे वास्तवात येण्याचे लक्षण. मात्र, परराष्ट्र धोरणातील कल्पनाविलास अद्याप पूर्णपणे संपलेला नाही. अलिप्तवादाची जागा आता 'स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी'ने (व्यूहात्मक स्वायत्तता) घेतली आहे. म्हणजे सामरीक किंवा व्यूहात्मक निर्णय घेताना अन्य देशांचा दबाव येऊ न देता स्वायत्तपणे निर्णय घेणे. पण, देश जोपर्यंत आर्थिक, औद्योगिक, संरक्षण, संशोधन आणि ऊर्जा आदी क्षेत्रांत स्वयंपूर्ण बनत नाही, तोपर्यंत 'स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी' या संकल्पनेला काही अर्थ नाही.

तिच गोष्ट 'सॉफ्ट पॉवर' किंवा 'सौम्यशक्ती'ची आहे. जगात योगसाधनेविषयी कुतुहल वाढले, भारतीय चित्रपट लोकप्रिय होऊ लागले, इडली–वडा अशा दोन–चार भारतीय पदार्थांची नावे ऑक्सफर्ड शब्दकोशात सामील झाली म्हणजे भारताचे युग अवतरले, असे मानण्याची रीत आजकाल पाहावयास मिळते. एकंदर परराष्ट्र व्यवहारात या बाबींचे महत्त्व मर्यादित आहे, हे समजून घेतले पाहिजे.

1997 ते 2002 पर्यंत मुक्त व्यापारच्या संकल्पनेला यशस्वी करण्यासाठीबाह्य वस्तूवरच्या आयातीवर अनेक प्रकारची सूट या सारखी घोषणा केली आहे.[१३] परराष्ट्र धोरण हे मूलतः आर्थिक–व्यापारी आणि संरक्षणविषयक हितसंबंधांतून आकाराला येत असते. या दोन्ही आघाड्यांवर आज भारत निर्णायक वळणांवर उभा आहे. या संदर्भात भारत आता जे निर्णय घेतो त्यावर त्याचे बऱ्याच अंशी भवितव्य अवलंबून असणार आहे. तेव्हा, निर्णय घेताना तो विचारपूर्वक घेणे आणि एकदा निर्णय घेतला की, अनेक आघाड्यांवर युद्धपातळीवर कामाला लागणे, यावाचून गत्यंतर नाही. तसे करताना फुकाच्या आदर्शवादी संकल्पनांच्या जोखडातून देशाला बाहेर काढण्याबरोबरच वास्तवाची कास धरणे, ही मोठी आव्हाने असणार आहेत.

परराष्ट्र धोरणाचे लोकशाहीकरण करून परराष्ट्र धोरणाची निर्णयनिर्मिती प्रक्रिया ही अधिकाधिक लोकशाही पद्धतीने झाली पाहिजेय त्यात लोकांना सामावून घेतले पाहिजे तरच एकविसाव्या शतकातील आव्हाने भारत पेलू शकेल.

**संदर्भ –**


1. *प्रा, व्ही. बी. पाटील – भारताचे परराष्ट्र धोरण – के सागर पब्लिकेशन पुणे – तिसरी आवृत्ती – २०१६, पृक्र. 78*
2. *डॉ. शैलेन्द्र देवळाणकर – भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर – प्रतिमा प्रकाशन, पुणे दृ प्रथम आवृत्ती दृ २००७, पृक्र. ३७*
3. *प्रा, व्ही. बी. पाटील – भारताचे परराष्ट्र धोरण – के सागर पब्लिकेशन पुणे तिसरी आवृत्ती – २०१६, पृक्र. ६४*
4. *कित्ता, पृक्र. 69*
5. *कित्ता, पृक्र. 69*
6. *दैनिक लेख*
7. *संपा. डॉ. अशोक नाईकवाडे – जागतिक राजकारणातील भारताची भूमिका – कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २०१४, पृक्र. १०४*
8. *कित्ता दृ पृक्र. १३३*
9. *आर. एस. यादव – भारत की विदेश नीती – डार्लिंग किंडरस्ले (इंडिया) प्रा. लि. नई दिल्ली. २०१३, पृक्र. १७१*
10. *संपा. प्रतिभा टावरी – डॉ.विनोद गायकवाड – अर्जुन ओफसेट प्रिंटस शेगांव, प्रथम आवृत्ती २०१४, पृक्र. ६*
11. *दैनिक लेख*
12. *डॉ. प्रतिभा भोरजार – २१ व्या शतकातील भारतीय परराष्ट्र धोरणापुढील आव्हानांचे व्यवस्थापन – आधार पब्लिकेशन अमरावती, २०१४, पृक्र. 68*
13. *आर. एस. यादव भारत की विदेश नीती डार्लिंग किंडरस्ले (इंडिया) प्रा. लि. नई दिल्ली. २०१३, पृक्र. ४४१*